उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२५४ ■ बुधवार १७ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## नीटच्या प्रवेशपत्राचा घोळ सुरूच सर्व्हर समस्येने परिक्षार्थी हवालदिल

**मुंबई, दि. १६ : नीट पुनर्परीक्षा येत्या रविवारी (दि. २१ जून) होत आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी परीक्षा शुल्काच्या परताव्याची बँक खात्याच्या तपशिलाची अट घातली आहे. प्रवेशपत्र आणि शुल्क परतावा या दोन्ही प्रक्रिया राष्ट्रीय परीक्षा संस्थेने एकत्रित राबविल्याने, पुन्हा एकदा नीट परीक्षार्थींचे टेन्शन वाढले आहे. त्यातच सर्व्हरच्या तांत्रिक अडचणीने परीक्षार्थी हवालदिल झाले आहेत. देशभरात नोंदणी केलेल्या २२ लाखांपैकी केवळ चार लाख विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र डाऊनलोड झाले आहेत. दरम्यान, नीट परिक्षेत गैरप्रकार होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने २२ जून पर्यंत देशात टेलीग्राम यंत्रणा स्थगित केली आहे. सरकार विविध उपाय करत असले तरी मध्येच काहीना काही विघ्न उभे राहत आहे.**




वैद्यकीय पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी अद्याप देशभरात नोंदणी केलेल्या २२ लाखांपैकी केवळ चार लाख विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र डाऊनलोड झाले आहेत. अद्याप १८ लाख ७९ हजार ७२३ विद्यार्थी प्रवेशपत्राच्या प्रतिक्षेत आहेत. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) ही आकडेवारी जाहीर केली आहे. सोमवारी दिवसभर परीक्षार्थी प्रवेशपत्र डाऊनलोड करत होते. मात्र बँक तपशील भरण्याने प्रवेशपत्र डाऊनलोड झाली नसल्याने हवालदिल झाले. देशभरातून एनटीएने दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर परीक्षार्थी संपर्क साधत होते. अखेर सर्व्हरची अडचण दूर केली जाईल, असे यंत्रणेने ऑनलाईन जाहीर केले आहे.

**परताव्यासाठी दुरुस्ती विंडो**

नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने एनटीएने तीन मे २०२६ ला झालेली परीक्षा पुन्हा २१ जूनला घेण्याचा निर्णय घेतला. पूर्वी दिलेल्या परीक्षेचे शुल्क परताव्याचा निर्णय झाला. त्यासाठी नोंदणी पोर्टलद्वारे परीक्षार्थींना बँक खात्याचे तपशील भरण्याची संधी दिली होती. मात्र छाननीत अवैध खाते आणि इतर चुकीचा तपशील आढळून आला. त्यामुळे पुन्हा बँक खात्याचे तपशील पडताळून दुरुस्त करून शुल्क परताव्यासाठी बँक खाते पुनर्सत्यापन, दुरुस्ती विंडो एनटीएन सुरू करणार आहे. नोंदणीकृत मोबाईलवर ओटीपी मिळाल्यानंतरच या सुविधेत प्रवेश मिळणार आहे.

**काहींची परीक्षा केंद्रे बदलली**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने सर्वच ठिकाणच्या परीक्षा देण्यासाठी जिल्हा तोच ठेवला आहे. यापूर्वी तीन जूनच्या (पान ४ वर)

## बारा तासांत दोनदा भूकंप वसमतकर झाले चिंतातूर


वसमत, दि. १६ : हिंगोली जिल्ह्याला सलग बसत असलेल्या भूकंपाच्या धक्क्यांचे सत्र थांबताना दिसत नाही. वसमत तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात सोमवारी रात्री आणि मंगळवारी पहाटे पुन्हा एकदा भूकंपाच्या जोरदार धक्क्यांनी हादरला. मंगळवारी पहाटे पावणेपाचच्या सुमारास तीन रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली आहे. अवघ्या बारा तासांत दोन मोठे धक्के बसल्यामुळे पांगरा शिंदे परिसरासह संपूर्ण तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोमवारी रात्री नऊ वाजून नऊ मिनिटांनी वसमत तालुक्यातील पांगरा-शिंदे आणि आसपासच्या परिसरात भूकंपाचा पहिला धक्का जाणवला. या धक्क्यामुळे भयभीत झालेल्या ग्रामस्थांनी संभाव्य धोका ओळखून पूर्ण रात्र जागून काढली. हा थरार संपत नाही तोच, दुसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवारी पहाटे पावणेपाचच्या (पान ४ वर)

## कर्जमाफीसाठी शेतकऱ्याचे आगळे वेगळे लक्षवेधी आंदोलन; प्रतीकात्मक अंत्ययात्रेनंतर विहिरीत उडी

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचा आरोप करत नंदुरबार तालुक्यातील सैताने येथील शेतकरी प्रमोद पाटील यांनी मंगळवारी आगळे वेगळे आंदोलन केले. सरसकट कर्जमाफी आणि शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी त्यांनी स्वतः:ची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढून त्यानंतर थेट विहिरीत उडी घेत आंदोलनाला वेगळे स्वरूप दिले.**





सैताने गावातील विठ्ठल मंदिर परिसरात आयोजित या आंदोलनात गावकरी व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. आंदोलनाला धार्मिक आणि सामाजिक स्वरूप देण्यासाठी भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर प्रमोद पाटील यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली.

अंत्ययात्रा गावातून फिरत विहिरीजवळ पोहोचल्यावर पोलिसांनी आंदोलन थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र शेतकरी व ग्रामस्थांच्या आग्रहामुळे आंदोलन सुरू ठेवण्यात आले. यावेळी प्रमोद पाटील यांनी आपण आत्महत्या करणार नसून शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देत असल्याचे स्पष्ट करत अंगावरील कपडे काढून विहिरीत उडी घेतली. या घटनेमुळे उपस्थित नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. विहिरीतील पाण्यावर तरंगत राहून त्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी सरसकट कर्जमाफी लागू करावी, सातबारा कोरा करावा आणि शेतीविषयक प्रश्न सोडवावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या अनोख्या आणि अफलातून आंदोलनाची जिल्हाभर चर्चा होत असून शेतकरी प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## नगराध्यक्ष जयवंत जाधव उपाध्यक्ष नगराळेंच्या हस्ते नवापूरला काँक्रीट रस्त्याच्या कामाचे भुमीपूजन

**नवापूर, दि.१६ (प्रतिनिधी)- नवापूर नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांची एकहाती सत्ता आल्यानंतर शहरातील विकासकामांना गती मिळाली असून प्रभाग क्रमांक ३ मधील शास्त्रीनगर चौक ते गीता सॉ मिल मार्गे नारायणपूर रोडपर्यंत काँक्रीट रस्ता व गटार लाईन बांधकामाच्या कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला.**



सुमारे ४७ लाख ८९ हजार रुपये खर्चाच्या या विकासकामाचे भूमिपूजन नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, आरोग्य सभापती सौ. मिनल लोहार, नगरसेवक मनोहर गावीत, अल्तमस खाटीक, उमेश चव्हाण, सी.ए. वतन अग्रवाल, नावीद शेख, नगरसेविका भाग्यश्री जैनु गावीत, आयशा व्होरा, तसेच सोमित्र गावीत, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष मनोहर नगराळे, शहर उपाध्यक्ष राजू गावीत, माजी उपनगराध्यक्ष फारुक शहा, अमृत लोहार, अविनाश वसावे, राजू आगळे, सनी सावरे, गुलाम व्होरा, (पान २ वर)

## सप्टेंबरमध्ये जिल्हा राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

धुळे, दि. १६- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यात शनिवार, १२ सप्टेंबर,२०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष न्या. एस.एस.भीष्म यांनी केले आहे.

शनिवार, १२ सप्टेंबर, २०२६ रोजी होणाऱ्या न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, १३८ धनादेश अनादरीत झाल्याची प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपत्र, महानगरपालिका व ग्रामपंचायत (पान २ वर)

## भगवान बिरसा मुंडांचा पुतळा उभारणार आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते भूमिपूजन

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- शहरातील नवापूर चौफुली परिसरातील देवमोगरा माता मंदिराजवळील टेकडीवर भगवान बिरसा मुंडा यांचा साडेआठ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन शिवसेना नेते तथा आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. या ठिकाणाचे सुशोभीकरण करून आकर्षक बगीचा व पिकनिक पॉइंट विकसित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.**

भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा शहरात उभारण्याची मागणी आदिवासी समाजासह विविध स्तरांतून होत होती पुतळा नेमका कुठे उभारायचा याबाबत अनेक वेळा विविध मते व्यक्त होत होती.अखेर नगरपालिकेने नवापूर चौफुली परिसरातील उंच टेकडीची निवड केली. टेकडीवरील या ठिकाणी पुतळा उभारण्यात आल्याने शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना भगवान बिरसा मुंडा यांचे दर्शन सहज घडणार आहे.

साडेआठ फूट उंचीचा हा पुतळा काळ्या पाषाणातून साकारण्यात येणार असून, त्याची निर्मिती राजस्थानातील जयपूर येथे केली जाणार आहे. पुतळ्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक आदिवासी दिवस किंवा नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा जयंतीदिनी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक वुईके यांच्या हस्ते पुतळ्याचे लोकार्पण करण्यात येईल, असे आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले, नगरपालिकेच्या (पान ४ वर)

## रस्ता व गटारीची समस्या वार्ड ३ ची जनता त्रस्त

धुळे, दि.१६- शहरातील प्रभाग क्र.३ मधील परिसरात रस्ता, गटारींची सोय केलेली नसल्याने जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आहे. समस्यांबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रार केल्यानंतरही दुर्लक्ष केले जात असल्याने परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यासह गटारीची समस्या तात्काळ सोडवावी या मागणीचे निवेदन दुसऱ्यांदा मनपा आयुक्तांना दिले.

प्रभाग क्र.३ मधील नाहटा प्रोव्हिजन, मारूती गल्ली, शंकर महाजन रोड मार्गे समाज मंदिर, आदर्श नगर, नदीकिनार पर्यंत रस्ता व गटार नसल्याने अडचणी निर्माण झाल्या (पान ४ वर)

## हस्ती बँकेस मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्रगत बँकिंग सेवेमुळे अग्रगण्य स्थान

**दोंडाईचा, दि.१६ - उत्तर महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात विश्वासार्हता, पारदर्शकता आणि प्रगत बँकिंग सेवांमुळे अग्रगण्य स्थान निर्माण केलेल्या दि हस्ती को-ऑप. बँक लि., दोंडाईचा या बँकेला भारत सरकारच्या सहकार मंत्रालयांतर्गत केंद्रीय सहकारी संस्था निबंधक (सीआरसीएस), नवी दिल्ली यांच्याकडून मल्टीस्टेट सहकारी बँक म्हणून नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.**



या यशमागे बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. हस्तीमलजी जैन यांच्या दूरदर्शी विचार, मूल्याधिष्ठित नेतृत्वातून ग्रामीण भागातून सुरू झालेल्या हस्ती बँकेने ग्राहकांचा दृढ विश्वास, आर्थिक शिस्त, पारदर्शक प्रशासन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराच्या बळावर सातत्यपूर्ण प्रगती साधली आहे. मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त करून बँकेने राष्ट्रीय स्तरावरील वाटचालीचे पहिले महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. या मान्यतेमुळे बँकेला विविध राज्यांमध्ये (पान २ वर)

## ट्रकखाली चिरडून महिला जागीच ठार

धुळे, दि.१६- पिंपळनेर येथील शेलबारी (ता. साक्री) घाटात भरधाव ट्रकने मोटरसायकला धडक दिली, अपघातात महिला ठार एक जण जखमी झाला. सोमवारी (ता.१५) झालेल्या अपघात प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद झाली.

पिंपळनेरकडून भावसिंग देवसिंग मालुसरे, नातेवाईक रेखाबाई विक्रम भारुडे (वय ३५, रा. चिखली, ता. साक्री) यांच्यासोबत मोटर सायकलने (एमएच१८/बीडब्ब्लू २३९७) शेलबारीकडे जात होते. सकाळी अकराच्या सुमारास शेलबारी घाटात हॉटेल सरकारसमोर मागून येणाऱ्या ट्रकने (केए ५६/७२३५) मोटरसायकलला मागून जोरदार धडक दिली. (पान ४ वर)

## कृतीबेन पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक येथे सुवर्ण प्राशन शिबिराचे आयोजन

**शिरपूर, दि.१६ (प्रतिनिधी)- एस.व्ही.के.एम. संचलित कृतीबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, शिरपूर यांच्या वतीने पुष्य नक्षत्राच्या शुभ मुहूर्तावर बुधवार, दि. १७ जून २०२६ रोजी सुवर्ण प्राशन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

बालकांच्या सर्वांगीण शारीरिक व मानसिक विकासासाठी उपयुक्त मानल्या जाणाऱ्या या शिबिराचा लाभ पालकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सुवर्ण प्राशन हा आयुर्वेदातील एक प्राचीन व पारंपरिक संस्कार असून त्यामध्ये शुद्ध सुवर्ण भस्म, मध, तूप तसेच ब्राह्मी, शंखपुष्पी यांसारख्या औषधी वनस्पतींच्या साहाय्याने तयार केलेले औषध मुलांना दिले जाते. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास, स्मरणशक्ती व बुद्धिमत्ता विकसित होण्यास, पचनशक्ती सुधारण्यास तसेच शारीरिक वाढ आणि मानसिक विकासास मदत होते, असे आयुर्वेदशास्त्रात नमूद करण्यात आले आहे.

सुवर्ण प्राशनामुळे मुलांची एकाग्रता, आकलनशक्ती व शिकण्याची क्षमता वाढण्यास मदत होते. तसेच वारंवार होणारे सर्दी, खोकला व इतर संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळण्यास सहाय्य होते. जन्मापासून ते साधारण १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना सुवर्ण प्राशन देता येते. मात्र ते नेहमी पात्र आयुर्वेदिक वैद्यांच्या मार्गदर्शनाखालीच देणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या शिबिरासाठी पालकांनी आपल्या पाल्यांचे नाव आगाऊ नोंदवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिराचे ठिकाण एस.व्ही.के.एम. संचलित श्रीमती कृतीबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, महाराजा कॉम्प्लेक्स, शिरपूर पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मागे, शिरपूर येथे आहे. क्लिनिकची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ७ अशी आहे. नावनोंदणीसाठी ९३२२४०९८९९ या क्रमांकावर संपर्क साधावा. बालकांच्या आरोग्यासाठी सुवर्णप्राशन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### संविधान संरक्षण समितीची मागणी

## मुडेंसारख्या अधिकाऱ्याची बदली नको बौध्दभुमी पुर्नवसनाचा प्रश्न मार्गी लावा



**धुळे, दि.१६- अन्न आणि औषध प्रशासनाने आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या यांच्या सक्षम कार्यपध्दतीमुळे त्यांची बदली करण्यात येवू नये. तसेच कल्याण येथील बौध्दभुमीच्या पुनर्वसनचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा. या मागणीचे निवेदन मुख्यमंत्र्यांना निवासी उप जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संविधान संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिले.**

निवेदनात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध भेसळ, गुटखा व अवैध व्यवसायांविरोधात केलेल्या धडक कारवाईचे कौतुक करण्यात आले आहे. त्यांच्या कार्यक्षम व प्रामाणिक कामगिरीमुळे जनतेच्या आरोग्याचे संरक्षण होत असून शासनाची प्रतिमा अधिक मजबूत होत असल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे त्यांची बदली इतरत्र करू नये तसेच राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रणासाठी त्यांना महत्त्वाची जबाबदारी द्यावी. तसेच भेसळखोर व गुटखा माफियांविरोधातील कठोर कारवाईमुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यांना (पान ४ वर)

## आयपीओ, क्युआयबीच्या माध्यमातून शिक्षकाची तेवीस लाखांवर फसवणूक

**धुळे, दि.१६- जास्त मोबदल्याचे आमीष दाखवून ऑनलाईन योजनांमध्ये फसवणुक केल्याची घटना उघडकीस आली. शेअर मार्केटमध्ये आयपीओ आणि क्युआयबीच्या माध्यमातून अधिक परताव्याचे आमिष दाखवून धुळ्यातील शिक्षकाची २३ लाख ८७ हजारात फसवणूक झाली.**

येथील चितोड रोड परिसरातील शिक्षक चंद्रकांत पुनमचंद सुर्यवंशी (वय ४५, रा.५ , श्रीकृष्ण कॉलनी) यांना जुलै ते ऑगस्ट दरम्यान दोन सायबर गुन्हेगारांनी मोबाईलवर संपर्क साधला. शेअर मार्केटमधील आयपीओ आणि क्युआयबीबाबत माहिती दिली, गुंतवणूकीतून आर्थिक लाभ होणार असल्याचे सांगितले, संबंधित दोघांवर विश्वास ठेवून चंद्रकांत सूर्यवंशी यांनी मोबाईलवर आलेल्या लिंकद्वारे मॅट अकाउंट तयार केले. त्यानंतर आरोपींनी सांगितलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर फिर्यादी यांनी आयपीओ आणि क्युआयबीद्वारे एकूण २३ लाख ८७ हजार रुपये ऑनलाइन पाठविले. पण यात आपली फसवणूक झाल्याचे चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या लक्षात आले. सायबर पोलिस ठाण्यात संशयित मुकेश कुमार (८६०२५३६९४२), आर्या (९६९०८२९१७७) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,50,000 रु.+3% GST
चांदी- 2,56,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## अनु.जातीचे दाखले द्या कोळी महासंघाची मागणी

धुळे, दि.१६- महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीतील बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळावे, रक्त नात्यातील समाज बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळावे यासाठी तत्कालिन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक दि.२० ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आली. त्याअनुषंगाने परिपत्रक काढणे गरजेचे असतांना अद्याप परिपत्रक काढण्यात आले नाही. अनुसुचित जमातीचे दाखले मिळण्याबाबत परिपत्रक काढण्यात यावे. या मागणीचे निवेदन कोळी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना (पान ४ वर)

## अवैध दारू व ताडी अड्ड्यांवर राज्य उत्पादन शुल्काची मोठी कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- पुणे येथे गावठी हातभट्टी दारूमुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, नंदुरबार जिल्ह्यात अवैध दारू आणि ताडी विक्री केंद्रांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. राज्य उत्पादन शुल्क नंदुरबारच्या अधीक्षक श्रीमती स्नेहा सराफ यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात गावठी हातभट्टी निर्मूलन मोहीम राबविण्यात आली, असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क निरिक्षक व्ही.ए . चौरे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.**



दिनांक २९ मे २०२६ ते १४ जून २०२६ (पान ४ वर)

प्रथम स्मृतीदिन



स्व.राधेश्याम किशोरीलाल वर्मा
(स्वर्गवास दि.- १७/६/२०२५)
अत्यंत प्रतीकुल परिस्थितीसे, अपार कष्ट सहकर आपने हमे जीवन मे सक्षम बनाया, आप हमेशा हमारे हदयमे विराजमान रहेंगे और आपका आशिर्वाद भी हमारे साथ रहेगा
आपके पवित्र श्री चरणोमे
विनम्र अभिवादन
- शोकाकूल -
समस्त वर्मा (गोयल) परिवार

सेंद्रिय जांभुळ



संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
* संपर्क *
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६



## प्रांत.अधिकारी व शेतकऱ्यांची बैठक मागण्या मान्य करा तरच मोजणी शक्य

धुळे, दि. १६- धुळे **तालुक्यातील आर्वी येथील कन्यादान लॉन्स येथे काल दि.१६ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजेस प्रांताधिकारी तथा सक्षम प्राधिकारी मनमाड-इंदोर (बाळापूर-पुरमेपाडा) रेल्वेमार्ग यांनी आर्वी, पुरमेपाडा, ललिंग, राणमाळ, पिंपरी व अन्य गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेतली व शेतकऱ्यांच्या सर्व समस्या जाणून घेतल्या व संपूर्ण भुसंपादनाची प्रक्रिया शेतकऱ्यांना समजावून सांगितली व शेतकऱ्यांनी शेतजमिनीची मोजणी करू द्यावी व सहकार्य करावे असे आवाहन सर्व शेतकऱ्यांना केले परंतु सर्व शेतकऱ्यांनी एकामताने जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आम्ही कुठलीही मोजणी करू देणार आहे असे स्पष्ट शब्दात सांगितले व शासनाने कुठलीही जबरदस्ती केल्याचा प्रत्यन केल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याला सर्वस्वि भूसंपादन विभाग जबाबदार राहतील. असा इशारा दिला.**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांमध्ये (पान ४ वर)

## पवनराजे हत्याकांड निकाल वीस जूनला

नवी दिल्ली, दि. १६ : राज्याच्या राजकीय वर्तुळात दोन दशकांपासून बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड खटल्याच्या निकालाची प्रतिक्षा आणखी काही दिवसांनी वाढली आहे. या प्रकरणाचा अंतिम निकाल आज लागण्याची शक्यता होती. मात्र, निकाल देण्यासाठी आणखी वेळ लागणार असल्याचे न्यायालयाने सांगितले. आज सकाळी अकराला या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली, तेव्हा पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र खासदार ओमराजे निंबाळकर कुटुंबासह न्यायालयात उपस्थित होते. तसेच या (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## संकटसमयी माणुसकीचा धर्मच मोठा

गेल्या काही वर्षांपासून आपल्या देशात आणि महाराष्ट्रात विशिष्ट धर्म आणि त्या धर्मातील माणसांना पाण्यात बघण्याची स्पर्धा लागलेली आहे. जो धर्मनिरपेक्ष छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो तो अल्पसंख्याकांना अवश्य शिव्या देतो. वास्तविक शिवाजी महाराजांची लढाई ही कुठल्या धर्माच्या विरोधात नव्हती तर ती शासकांच्या विरोधात होती मग ते निजाम असोत, मोगल असोत की, इंग्रज असोत त्यापैकी जे कोणी शासक असतील त्यांच्या अन्याया विरुद्ध महाराज लढले. त्यात असंख्य मुस्लिम होते. ते तोफ खान्याचे प्रमुख होते. आरमारात सरदार होते. तेव्हापासून महाराष्ट्रात सर्वधर्मसमभावाची परंपरा सुरू आहे. महाराष्ट्रात जेवढे समाज सुधारक झाले तेवढ्यांनी ही परंपरा पुढे नेली. त्यामुळे महाराष्ट्र हा पुरोगामी ठरला. मात्र गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या या परंपरेला नख लागले आहे. ते छत्रपती शिवाजी महाराजांचा रोकडा धर्म विसरले. फुले शाहू आंबेडकरांचा विचार विसरले. महाराष्ट्रातल्या तरुणांना धर्मांध बनविण्याचे मिशन काही सनातली विचाराच्या लोकांनी हाती घेतले. त्यातून राज्यातील अल्पसंख्याक मुख्य कुठल्याही धर्माचे असू देत त्यांना लक्ष करण्यात आले. संघटितपणे विचार करून लोकांच्या मनात जहर पसरविण्याचे काम आणि त्या विचारसरणीचेच लोकप्रतिनिधी निवडून यावेत यासाठीची व्यूहरचना तयार करून विभाजन वादाला खत पाणी घालता येईल अशा प्रकारच्या विचारसरणीचे लोकप्रतिनिधी सर्वोच्च सभागृहात निवडून पाठवण्याचे नियोजन त्यांनी केले आणि त्याचे यशस्वी झाले. या वातावरणामुळे पुरोगामी महाराष्ट्र पूर्णपणे उलमडून पडला आणि तो उत्तर प्रदेशातील गोबर पट्ट्याशी आपसूक जोडला गेला. प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार देखील महाराष्ट्र दक्षिण पंथी आहे असा होता. परंतु आता महाराजांचे हे तत्व धाब्यावर बसविण्यात आलेले आहे. त्यामुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुव स्वतःला समजणारे लोक एकमेकांना पाण्यात बघत असले तरी सर्वसामान्य माणूस हा आजही समाजात धर्म आणि जात विसरून राहतो. एकमेकांना सहकार्य करतो. एकमेकांच्या सुखदुःखात धावून जातो. आर्थिक मदत करतो. लग्नकार्यात सहकार्य करतो. अशी कैक उदाहरणे दाखविता येतील. अशाप्रकारे मनात एका बाजूला विषाच्या कुप्या भरलेल्या असताना त्याच वेळी दुसऱ्या बाजूला माणुसकीचे बाजार धर्म बाजूला ठेवून जात बाजूला ठेवून सतत वाहत असतात. नुकत्याच झालेल्या दोन दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर माणुसकीचे गहिवर अनेकांनी बघितले आणि त्यांच्या मुखातून दुवा निघाला.सोलापूर जिल्ह्यातील तांदुळवाडी येथे घडलेली दुर्घटना अत्यंत हृदयद्रावक आहे. चारचाकी ट्रेक्स वाहन विहिरीत कोसळून १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण राज्य हादरून गेले. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत असतानाच या काळोखात मानवतेचा एक तेजस्वी किरणही दिसून आला.

समोरचे वाहन विहिरीत पडल्याचे पाहताच इरफान मुजावर हा तिथे मौजूद होता. त्या तरूणिने क्षणाचाही विलंब न करता मदतीसाठी धाव घेतली. गावकऱ्यांना माहिती देऊन त्याने स्वतः विहिरीत उडी घेतली. उश आणि सर्वप्रथम एका चार वर्षीय चिमुकल्याला, त्यानंतर आणखी तीन जणांना पाण्यातून सुरक्षित बाहेर काढले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता चार जणांचे प्राण वाचवणारा इरफान मुजावर हा त्या कुटुंबांसाठी देवदूतच ठरला. लहानग्या मुलांच्या पोटात पाणी गेलेले होते ते त्याने डिसेंबर काढून त्या मुलाचा श्वास मोकळा केला. दोघे पोहत होते त्यामुळे वाचले. बाकीचे वाहन उलटे विहिरीच्या पाण्यात पडल्याने त्यातून बाहेर पडू शकले नाहीत त्यामुळे गत प्राण झाले.पण इरफान ने त्याला शक्य झाले तेवढे लोक सुरक्षित बाहेर काढले.अशाच एका रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरींने त्याच परिसरातील काहींचे प्राण घेतले. ते वाहन थेट विहिरीत जाऊन पडले होते. त्यानंतरची ही दुसरी दुर्घटना होय.लोक, प्रशासन, आणि सरकार हे सगळेच अशा घटनांना कारणीभूत असतात. ते फारच बेफिकीर वागतात म्हणून लोक माती मोल मृत्युमुखी पडतात. अंधेर नगरी चौपट राजा अशीच काहीशी अवस्था आपल्या प्रदेशात आहे. माणसांचे मरण अतिशय स्वस्त झाले असून बाकी सगळे महागडे आहे.

या घटनेच्या काही दिवस आधी, साधारणपणे पंधरवड्याभरापूर्वी दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील एका हॉटेलला भीषण आग लागली होती. आगीने रौद्र रूप धारण केल्याने इमारतीतील अनेकांचे प्राण धोक्यात आले. काही जणांनी दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरून जीव वाचवण्यासाठी खाली उड्या मारण्याचा प्रयत्न केला. हे दृश्य पाहून समोरच गाद्यांचे दुकान असलेले रियाजुद्दीन शेख यांचे हृदय द्रवले. त्यांनी आपला मुलगा रहमानच्या मदतीने दुकानातील गाद्या तातडीने रस्त्यावर अंथरल्या. त्यामुळे इमारतीतील लोकांनी त्यावर उड्या घेतल्या आणि अनेकांचे प्राण वाचले.या घटनेनंतर रियाजुद्दीन शेख यांनी अत्यंत मर्मस्पर्शी शब्दांत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, दुकानाचे नुकसान भरून निघेल; पण अनेकांचे प्राण वाचवता आले, हेच आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. या बचावकार्यामध्ये आणखी काही मुस्लिम नागरिकांनीही पुढाकार घेत जीव वाचवण्यासाठी मदत केली.

सोलापूर आणि दिल्लीतील या दोन्ही घटना आपल्याला एकच संदेश देतात. संकटाच्या क्षणी माणूस जात, धर्म, पंथ किंवा भाषा पाहत नाही. तो केवळ दुसऱ्या माणसाचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करतो. माणुसकीचा धर्म हा सर्व धर्मांपेक्षा मोठा असतो.दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत समाजात विभाजनवादी आणि द्वेषमूलक प्रचार वाढताना दिसत आहे. अल्पसंख्याकांविषयी संशय, भीती आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयतक होत आहेत. अशा परिस्थितीत इरफान मुजावर, रियाजुद्दीन शेख, वसीम, रहमान आणि त्यांच्यासारखे असंख्य सामान्य नागरिक आपल्या कृतीतून वेगळाच संदेश देतात. ते सांगतात की संकटाच्या वेळी मदतीला धावून जाणारा माणूस ना हिंदू असतो, ना मुस्लीम; तो फक्त माणूस असतो.माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हीच आमची प्रार्थना आणि हेच आमचे मागणे या विचाराचे ते जिवंत उदाहरण आहेत. संविधानाने ज्या बंधुता, समता आणि मानवतेच्या मूल्यांचा पुरस्कार केला आहे, त्यांचे खरे रक्षणकर्ते हेच सामान्य लोक आहेत. समाजाला जोडणाऱ्या अशा व्यक्तींमुळेच लोकशाही मजबूत होते आणि मानवतेवरील विश्वास कायम राहतो.

मात्र स्वातंत्र्याची किंमत काय असते हे ज्यांच्या गावीही नाही, ज्यांना राज्यघटना कळत नाही, त्यातील तरतुदींशी काही एक घेणे देणे नाही. ज्यांना फक्त दांडगाईच माहीत आहे. अशांना त्यांचा धर्म प्रिय असतो पण त्यातील तत्वांशी त्यांचा संबंध नसतो. धर्म वाचवायचा किंवा तो संकटात आहे असे जे समजतात अथवा बोलत असतात त्यांना धर्म कुठली तरी वस्तु आहे असे वाटत असते एवढे त्यांचे अज्ञान असते. अशा लोकांसमोर लोकशाहीची पोथी वाचण्यात काही अर्थ नसतो. त्यांच्या पेक्षा इतरांचे जीव वाचवण्यासाठी स्वतःत्या जीवाची होळी करण्यास तयार असतात ते अतिसामान्य असले तरी त्यांचे मोठेपण तराजूत तोरणा येणार नाही. इरफान मुजावर किंवा सिराजुद्दिन त्यापैकी आहेत. अल्लाचे नाव घेत त्याच्या पेटीतील रक्कम चोरण्याची इच्छा त्यांच्या मनात कधीच येणार नाही. ते श्रीरामाच्या नावाचा जप करणाऱ्या आणि त्याच्या नावाचा वापर राजकारणासाठी व सत्तेसाठी करणाऱ्यांचे काम असते.अहमदशहा अब्दाली एकदाच भारताच्या बाहेरून येऊन सोमनाथ मंदिर लुटण्यासाठी आला होता आणि त्याला त्यासाठी सर्वतोपरी मदत आपल्या देशातील सोमनाथाच्या भक्त राजांनी केली होती. त्याच प्रवृत्तीच्या हातात श्रीराम मंदिराचे व्यवस्थापन आहे. करोडो रूपयांची चोरी होऊनही त्यांची चौकशी होत नाही ते आम्हाला धर्म आणि त्याची व्याख्या शिकवतील काय असा प्रश्न सहज निर्माण होतो. समाजात विभाजनाचे विष पेरण्याचे काम असेच लोक सतत करीत असतात. त्यांच्या कारवायांना आपण बळी पडत असतो. त्याचा विचार करण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे.

## पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्राकडून सातशे तेहत्तीस कोटी मंजूर

**मुंबई, दि. १६ : महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारकडून सातशे तेहत्तीस कोटी २८ लाख रुपयांची योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेमार्फत ६० टक्के निधी केंद्र तर ४० टक्के निधी राज्य सरकार देणार आहे. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहेत. सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहिम, सायबर सुरक्षा, आधुनिक शस्त्रे, वाहने सुसज्ज करण्यास या योजनेची मदत होणार आहे.**

केंद्र सरकारकडून ७३३.२८ कोटी रुपयांची योजना मंजूर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करत केंद्र सरकारचे आभार मानलेत. या योजनेत ६० टक्के निधी केंद्र सरकार तर ४० टक्के निधी राज्य सरकार देईल. महाराष्ट्र पोलिस दलासाठी इतका मोठा निधी मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा मनापासून आभारी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहीम, सायबर सुरक्षा,एआय तंत्रज्ञानाचा अधिक वापर, नागरिकांची सुरक्षा, आधुनिक शस्त्र, वाहने अशा अनेक दृष्टीने महाराष्ट्र पोलिस दल अधिक सुसज्ज करणे यातून शक्य होणार आहे.

### तांत्रिक बळ तितकेच गरजेचे

सध्याच्या काळात नेहमीच्या गुन्हेगारीसोबतच डिजिटल आणि संघटित गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अशा वेळी पोलिसांकडे केवळ मनुष्यबळ असून चालणार नाही, तर तांत्रिक बळ असणेही तितकेच गरजेचे आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र पोलिस दल देशातील सर्वात सुसज्ज, कार्यक्षम आणि हायटेक दलांपैकी एक बनेल, असा विश्वास प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त केला जात आहे. सायबर गुन्हे आणि ऑनलाईन फसवणूक रोखण्यासाठी प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर व सायबर सेलचे सक्षमीकरणासाठी, राज्याच्या विस्तीर्ण किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आधुनिक यंत्रणा आणि संसाधनांची उभारणीसाठी, पोलिस दलाला अत्याधुनिक शस्त्रे आणि घटनास्थळी तातडीने पोहोचण्यासाठी नवीन वेगवान वाहने पुरवणेयासाठी, नागरिक सुरक्षेअंतर्गत महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष तांत्रिक उपाययोजना करण्यासंदर्भात या निधीचा वापर केला जाणार आहे.

## वसंतराव नाईक शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**शहादा, दि.१६ (का.प्र.) - स्थानिक वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला. नवीन वर्षाचे स्वागत आणि पाचवीच्या वर्गात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा, यासाठी शाळेच्या वतीने विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

या प्रवेशोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांची स्वागत रॅली. नवोदित विद्यार्थ्यांची थेट सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमधून वाजत-गाजत रॅली काढण्यात आली. त्यानंतर या विद्यार्थ्यांचे अत्यंत उत्साही वातावरणात शाळेच्या प्रांगणात आगमन झाले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची रीतसर सुरुवात करण्यात आली.शाळेत पाऊल ठेवताच सर्व नवीन विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प, शासनाकडून प्राप्त झालेली नवीन कोरी पाठ्यपुस्तके आणि बिस्किटांचे पुढे देऊन त्यांचे गोड कौतुक करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. एम. पाटील, उपप्राचार्य जे. बी. पवार, उपमुख्याध्यापक एस. आर. बोरसे, पर्यवेक्षक ए. डी. खेडकर आणि खान ए. ए. प्रामुख्याने उपस्थित होते.

## संत सेना एज्युकेशनतर्फे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व सायकलींचे वितरण

**शहादा,दि.१६ (का.प्र.) - स्थानिक संत सेना एज्युकेशन फाउंडेशन शहादा यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव, शैक्षणिक साहित्य, शिष्यवृत्ती व सायकल वितरण सोहळा रामदेवबाबा नगर येथील श्री संत सेना नाभिक समाज भवन प्रांगणात मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार अत्यंत स्तुत्य ठरला आहे.**



कार्यक्रमाचा प्रारंभ उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती माता, संत सेना महाराज आणि लिंबच माता यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाभिक समाज पंच मंडळाचे अध्यक्ष उद्धव जांभळे होते, तर उद्घाटक म्हणून आमदार राजेश पाडवी उपस्थित होते.व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई मकरंद पाटील, पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पाटील, परेश पटेल, गिरीश महाले, संदीप रघुवंशी, नगरसेविका ममता पवार, लताबाई शिवदे, पाणीपुरवठा सभापती प्रदीप ठाकरे, नगरसेवक हरीश पाटील, भूषण पवार, विजय सोनवणे, भानुदास वाघ, संजय जांभळे, गणेश पाटील, प्रकाश जाधव, प्रा. डॉ. अनिल साळुंके, डॉ. जितेंद्र जाधव, संत सेना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष सोनवणे, सचिव अशोक जाधव, ज्ञानेश्वर जाधव आणि रवींद्र सोनवणे यांच्यासह समाज पंच मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. सोहळ्यात दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्याचबरोबर होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष सोनवणे, आशिष पवार, तेजस्विनी सोनवणे यांच्यासह काही विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सुचिता पवार यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सचिव अशोक जाधव यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अजितेम सोनवणे, रमण सोनवणे, हरीश सोलंकी, प्रा. रवींद्र जाधव, प्रा. डॉ. उद्धव जाधव, भिलू जांभळे, मयुर बोरदेकर, ज्ञानेश्वर सोलंकी, पुरुषोत्तम कन्हैया, रवींद्र सूर्यवंशी, सुनील सूर्यवंशी, अमृत सोनवणे, जयेश सोनवणे, आरती नांदेडकर आणि अनिता जाधव यांच्यासह सर्व संचालकांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला नाभिक समाजाचे बांधव, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### पान १ वरुन

## हस्ती बँकेस मल्टीस्टेट बँकेचा दर्जा

शाखा विस्तार, ठेवी व कर्ज व्यवसाय वृद्धी, डिजिटल बँकिंग सेवा बळकटीकरण, नव्या सभासद व ग्राहकांना सेवा उपलब्ध करून देणे तसेच रोजगार निर्मितीच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. बैंक लवकरच गुजरात राज्य मध्ये आपला विस्तार करणार आहे.

> दि हस्ती को-ऑप. बँकेला मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे बैंकेचे प्रेरणास्थान स्व.कांतीलाल जी जैन यांनी पाहिलेले एक स्वप्न पूर्ण झाले आहे. नजिकच्या काळात त्यांचे आणखी एक स्वप्न म्हणजे शेड्यूल्ड बैंक यासाठीही सर्व संचालक मंडळ प्रयत्नरत आहे. मल्टीस्टेट दर्जा हा आमच्यासाठी केवळ सन्मान नसून अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. बँकेचे व्हा.चेअरमन संजय दुग्गड, सर्व संचालक मंडळ, सभासद, ग्राहक, अधिकारी व कर्मचारी यांच्या महत्वपूर्ण योगदानामुळेच हे यश शक्य झाले आहे.
>
> **- कैलास चंद्रावती कांतीलाल जैन,** चेअरमन
> दि हस्ती को-ऑप. बँक लि., दोंडाईचा

याबाबत बँकेचे बोर्ड ऑफ मैनेजमेंट चे चेयरमैन मदन जैन म्हणाले की, मल्टीस्टेट मान्यता हा बँकेच्या प्रगतीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. आगामी काळात तंत्रज्ञानाधारित, सुरक्षित, पारदर्शक आणि ग्राहकाभिमुख बँकिंग सेवा अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मल्टी स्टेट परवानगी करिता बैंकेचे सीईओ सतीश जैन, बैंकिंग तज्ञ उल्हास रतक्पारखी, बैंकेचे माजी सीईओ प्रकाश कुचेरिया यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले. या यशाबद्दल बँकेचे उपाध्यक्ष संजय दुग्गड़, संचालक मंडळ, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट, अधिकारी, कर्मचारी, सभासद व ग्राहकांनी आनंद व्यक्त केला असून सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सप्टेंबरमध्ये जिल्हा राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीज वितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी प्रकरण ठेवण्याची प्रक्रिया ही अत्यंत सुलभ व पक्षकाराच्या हिताची आहे. ज्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. त्या न्यायालयात अर्ज दिल्यास दोन्ही पक्षाच्या सहमतीने लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी प्रकरण ठेवता येते तसेच लोकअदालतीमध्ये जर प्रकरण सामोपचाराने तडजोड झाली नाही तर ते नियमित न्यायालयाकडे चालविता येते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ याचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो, न्यायालयात भरलेले कोर्ट शुल्क परत मिळते. त्यामुळे शनिवार, १२ सप्टेंबर, २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे धुळे जिल्हा न्यायालयात आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करुन या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधिश प्रविण कुलकर्णी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## नगराध्यक्ष जयवंत जाधव उपाध्यक्ष नगराळेंच्या

सुलेखा पाटील, अर्जुन सावरे, इरफान कुरेशी, कृष्णा गावीत, मयूर सावरे व राजू शर्मा यांच्या उपस्थितीत श्रीफळ फोडून करण्यात आले. कामाच्या शुभारंभामुळे शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगरपालिकेच्या विकासाभिमुख भूमिकेचे स्वागत केले. या रस्त्यामुळे प्रभाग क्रमांक ३ आणि ४ यांच्यातील संपर्क अधिक सुलभ होणार असून वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होणार आहे.

यावेळी नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी सांगितले की, हे काम सुवर्ण जयंती नागरी उत्थान योजने अंतर्गत होत असून शहरातील इतर भागांमध्येही विविध रस्ते व मूलभूत सुविधांच्या विकासकामांना लवकरच सुरुवात होणार आहे. नागरिकांनी कामाच्या गुणवत्तेकडे लक्ष देऊन दर्जेदार काम करून घेण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अमृत लोहार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावीत, नगराध्यक्ष जयवंत जाधव आणि उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांच्या नेतृत्वाखाली शहरात विकासकामांचा धडाका सुरू असून प्रभाग क्रमांक ३ व ४ ला जोडणाऱ्या या महत्त्वपूर्ण कॉंक्रीट रस्त्याच्या कामामुळे परिसराच्या विकासाला नवी चालना मिळणार आहे. शहरातील मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी नगरपालिकेकडून सुरू असलेल्या या विकासकामांचे नागरिकांकडून स्वागत होत असून नवापूर शहराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### प्रकाश में आज

**बाशा**




रजनीकांत, नगमा, रघुवरन, विजय कुमार, जनगराज, दिवन, शशिकुमार

## शब्दकोडे क्रमांक : २३८९

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | ७ | ■ |
| ८ | | ■ | ९ | | ■ | १० | | ■ | ११ | | १२ |
| | ■ | १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | | ■ | |
| ■ | १६ | ■ | १७ | १८ | | ■ | १९ | ■ | २० | २ | |
| २२ | | २३ | ■ | | ■ | २४ | | | ■ | | ■ |
| | ■ | २५ | | ■ | २६ | | | ■ | २७ | ■ | २८ |
| ■ | २९ | | ■ | र३० | | ■ | ३१ | | ■ | ३२ | |
| ३३ | | ■ | ३४ | | ■ | ३५ | | | ३६ | | ■ |
| | ■ | ३७ | | ■ | ३८ | ■ | ३९ | ४० | | ■ | ४१ |
| ■ | ४२ | ■ | ४३ | ४४ | | | ■ | ४५ | | ४६ | |
| ४७ | | | ■ | ४८ | | ■ | ४९ | | ■ | | ■ |
| ५० | | ■ | ५१ | | ■ | ५२ | | ■ | ५३ | | |

**आडवे शब्द :** १. संसार ३.अंधार दूर करणारा दिवा ५.चांगल्या आणि वाईटाची पारख करण्याची बुद्धी किंवा ज्ञान ८. भूतकाळ ९. समाजात मिळणारा आदर १०. गरिबांबद्दल किंवा प्राण्यांबद्दल वाटणारी करुणा ११. एखाद्या गोष्टीचे रहस्य १३. दिलेली हाक १४. चार चाकी वाहन १५. रानटी बैल १७.वनस्पतीची छाटलेली फांदी २०. मीठ २२. परिणय बंधनाचा सोहळा २४. पुरुषांचा पारंपरिक कुडता किंवा शर्ट २५.रिकामा, ज्याच्यामध्ये काहीही भरलेले नाही असा २६. बारा वाजेनंतरची वेळ किंवा मध्यान्ह काळ २७. तूप २९. मनात असलेली रुखरुख ३०. पर ३१.लांबी मोजण्याचे एक परिमाण ३२.झाडाचे वल्कल ३३.लठ्ठ, थोरला ३४.सोबत ३५. रस्ता तयार करण्यासाठी वापरले जाणारे लहान दगड ३६. चहा पिण्याचे मोठे भांडे ३७. मनाचा संताप किंवा शास्त्रीय संगीतातील धून ३९. शारीरिक किंवा मानसिक तीव्र वेदना ४३.एखाद्या कामात पूर्णपणे मग्न किंवा गुंग होणे ४५. जागरूक ४६. मानवी शरीर किंवा काया ४७. वेळ ४८.समस्येचा तोडगा किंवा शेत नांगरण्याचे साधन ४९. प्राण्यांमधील स्त्रीलिंगी जात ५०.केसांची कपाळावर येणारी बट ५१.संगीतातील लयीचा ठेका किंवा गती ५२. प्रेत जाळण्यासाठी रचलेले लाकूड ५३.मनातील तीव्र इच्छा, आकांक्षा किंवा अभिलाषा **उभे शब्द : १**. प्रगती केलेला, पुढारलेला २.आदरयुक्त टोपणनाव किंवा जुन्या काळातील एक पदवी ३.दिवस किंवा गरीब ४.गुणांची केलेली योग्य पारख किंवा आदर ६.अतिशय वेगाने धावणारा ७.कमी, उणे किंवा अपूर्ण असणे ८.घडून गेलेले ९.अंमल आणणारे १२. कठोर १४.कर्म १६.आजार बरा करण्यासाठी घेतली जाणारी औषधे १८. संघर्ष १९.नर्गिस, सुनील दत्त यांचा एक सिनेमा २१.बुद्धी २२. कात, चुना लावून तयार केलेले पान २३.हिरव्या रंगाचे किंवा हिरवेगार निसर्गरूप २४.पास- उलट लिहा २६. सुख- विरुद्ध २८.एखाद्या वस्तूची किंमत २९.ग्रंथाचे भाग ३०. संप्रदाय, मार्ग किंवा एखादा विशिष्ट धार्मिक गट ३२. फर्निचरसाठी वापरले जाणारे अत्यंत मजबूत लाकूड ३३. कपटाने विणलेले जाळे किंवा फसवणूक ३४. समुद्र ३६.आपल्या अंतःकरणाचे किंवा चित्ताचे ४०.कामामुळे झालेला त्रास ४१. आब ४२. किंचित गरम असलेले पाणी ४४.राजा-महाराजांचा राहण्याचा मोठा राजवाडा ४६.एक जंगली पशु ४७. मनातील बोच ४९.आई

### शब्दकोडे क्रमांक : २३८८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ति | बे | ट | ■ | ने | पा | ळ | ■ | स | मा | न | ता |
| ख | ल | ■ | वा | क | ळ | ■ | ता | ■ | डी | ■ | ठ |
| ट | ■ | सां | ज | ■ | त | क | रा | र | ■ | स | ■ |
| ■ | चा | ■ | वी | स | ■ | लं | ■ | य | ज | मा | न |
| दौ | ल | त | ■ | क | र | क | री | त | ■ | ज | र |
| ■ | क | ■ | को | ल | म | ■ | घ | ■ | क | ■ | क |
| वे | ■ | ती | ळ | ■ | जा | त | ■ | ना | रा | ज | ■ |
| स | ल | ■ | सा | मा | न | ■ | वा | व | र | ■ | पो |
| ■ | बा | र | ■ | ळी | ■ | पो | ट | ■ | ना | ट | क |
| ग | ड | ब | ड | ■ | को | री | ■ | मा | मा | ■ | ळ |
| व | ■ | डी | ■ | ता | क | ■ | ह | म | ■ | ता | ■ |
| त | न | ■ | म | ल | म | लं | ■ | ला | ग | व | ड |






# एमएसडब्ल्यू, बीएसडब्ल्यू विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपचा समारोप; प्रमाणपत्रांचे वाटप



**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- नंदुरबार येथील नवनिर्माण संस्था प्रकल्प कार्यालयात एमएसडब्ल्यू व बीएसडब्ल्यू विद्यार्थ्यांच्या एक महिन्याच्या इंटर्नशिपचा समारोप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी नंदुरबार परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुलभा महिरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सुलभा महिरे, आर डी राजपूत, डव्होकेट विनया मोडक तसेच नवनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रवी गोसावी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यां सुलभा महिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समाजकार्याचे क्षेत्र अत्यंत व्यापक असून प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर समाजात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करता येते. समाजहिताला प्राधान्य देत कार्य केल्यास समाजाच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देता येते, असे प्रतिपादन केले.

नवनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रवी गोसावी यांनी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व जनजागृतीपर प्रकल्पांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची ओळख करून देत त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

यावेळी आर.डी. राजपूत यांनी सिकल सेल ॲनिमिया व थॅलेसेमिया या आनुवंशिक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. या आजारांची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर तपासणीचे महत्त्व तसेच समाजामध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

ॲडव्होकेट विनया मोडक यांनी महिला सक्षमीकरण व महिला समुपदेशन केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ग्रामीण व शहरी भागात महिलांवर व मुलींवर होणारे अन्याय, अत्याचार किंवा कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांबाबत महिलांनी निर्भीडपणे आवाज उठविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिलांच्या संरक्षणासाठी जनजागृती करणे, त्यांना कायदेशीर व सामाजिक मदत उपलब्ध करून देणे आणि समाजकार्याचे विद्यार्थी म्हणून अशा उपक्रमांमध्ये पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात इंटर्नशिपच्या अनुभवांना उजाळा दिला. नवनिर्माण संस्था कार्यालयातील प्रत्यक्ष कामकाज, विविध सामाजिक प्रकल्प आणि क्षेत्रीय उपक्रमांमुळे त्यांच्या ज्ञानात मोठी भर पडली असून नेतृत्व, संवादकौशल्य, नियोजन, समन्वय, संघभावना आणि समाजाभिमुख कार्य करण्याची अनेक कौशल्ये एका महिन्याच्या कालावधीत आत्मसात करण्याची संधी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नवनिर्माण संस्थेच्या प्रकल्प व्यवस्थापक सुषमा सूर्यवंशी तसेच मनीषा पाडवी, सुहास कोकणी, उज्वला कोकणी, सागर पवार, शोभा मराठे, अनिता सूर्यवंशी आणि दिव्या शिरसाट यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत संस्थेच्या सामाजिक उपक्रमांना भविष्यातही अशीच गती मिळावी, अशी अपेक्षा जानवी पाटील ,तेजस्विनी पाटील ,वसंत पावरा यांनी प्रतिक्रियांच्या माध्यमातून व्यक्त केली.

उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या समारोप सोहळ्याने विद्यार्थ्यांना समाजकार्याची नवी दिशा, सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि समाजसेवेची प्रेरणा दिली.



# त्रिविक्रम मंदिरात धार्मिक कार्यक्रम संपन्न

**धुळे, दि.१६- या वर्षी जेष्ठ अधिक महिन्याच्या मंगल पर्वा निमित्ताने नवग्रहीतील त्रिविक्रम मंदिर संस्थानातर्फे विविध धार्मिक कार्यक्रम मंदिरात घेण्यात आले. मंदिरात रोज दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेसहा पर्यंत अधिक महिन्याची पोथी श्री दिनेश भंडारी गुरुजी यांनी वाचली भाविकांनी त्याचा लाभ घेतला. एक दिवसाचे संस्कार शिबीर देखील घेण्यात आले.**

त्यात संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र डोंगरे यांनी श्री त्रिविक्रमाची माहीती सांगितली. सदर महिना कश्यामुळे येतो हे समजावून दिले. मनाची शक्ती समजावून दिली व डॉ एन एम जोशी यांनी शिबीरार्थी कडून मनाचे श्लोक म्हणवून घेतले.विद्यार्थ्यांकडून श्री ललित कुलकर्णी व सौ दीपाली कुलकर्णी यांनी काही वस्तू तयार करून घेतल्या. त्या वस्तू त्यांना घरी देण्यात आल्या. समर्थ रामदास स्वामींनी रचलेले मनाचे श्लोकांचे पुस्तक विद्यार्थ्यांना देण्यात आले. जुन महिन्यात विविध कार्यक्रम संपन्न झाले.

श्री त्रिविक्रम मंदिर संस्थानातर्फे झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी श्री त्रिविक्रम मंदिर संस्थांनाचे अध्यक्ष प्रा देवेंद्र डोंगरे व सचिव चंद्रकांत नाईक संस्थेचे विश्वस्थ मोहन तरटे, चंद्रशेखर पुरोहित, एन एम जोशी उपस्थित होते. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी श्री अमोल जोशी, श्री शशिदादा जोशी, श्री गोविंद जोशी, रवि केटरर चे सेवक, श्री दिनेश भंडारी, श्री हरीश भंडारी, सौ प्रिया भंडारी, श्री शेखर कुलकर्णी, श्री गिरीश कुलकर्णी, ललित कुलकर्णी, सौ दीपाली कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले.

# न्याहळोदला वीजखांबावरील तारांचा धोका आ.राघवेंद्र भदाणेंमुळे टळला

**धुळे, दि.१६- धुळे तालुक्यातील न्याहळोद येथील प्रभाग क्रमांक तीनमधील खोलगल्ली परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वीज तारा धोकादायकरीत्या लोंबकळत होत्या. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. ग्रामस्थांनी ही गंभीर समस्या आ.राघवेंद्र पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तातडीने महावितरण अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश दिल्याने परिसरातील नागरिकांचा धोका टळला आहे.**



ग्रामस्थांची कैफियत ऐकल्यानंतर आमदार पाटील यांनी विज महावितरणच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार महावितरणने खोलगल्ली परिसरात तात्काळ दोन नवीन वीजखांब बसवून लोंबकळत्या तारा व्यवस्थित केल्या. त्यामुळे नागरिकांचा जीवघेणा धोका टळला आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आमदारांच्या हस्तक्षेपामुळे मार्गी लागल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. पावसाळ्यात लोंबकळत्या तारांमुळे शॉर्टसर्किट किंवा जीवितहानी होण्याची भीती होती, ती आता दूर झाली आहे.

वीजेच्या खांब बसविल्यानंतर राजेंद्र शिंपी, पिंटू कोळी, तात्या पवार, सोनू जिरे, मिनाबाई पवार, अशोक कोळी, बाबडू पवार, निलेश पवार, दत्तू कोळी, कैलास कोळी, रमाकांत सैंदाणे आदी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. आमदार राघवेंद्र पाटील यांचे आभार मानले आहेत. आमदार राघवेंद्र पाटील यांच्या तातडीच्या निर्णयक्षमतेमुळे काम जलद झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सुवर्णकार युवक संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, शैक्षणिक साहित्य वाटप

**धुळे, दि.१६- धुळे जिल्हा आहिर सुवर्णकार समाज संचालित सुवर्णकार युवक संघटना, धुळे यांच्यावतीने शनिवार, २७ जुन २०२६ रोजी जो. आर. सिटी हायस्कूल, पोलीस अधीक्षक कार्यालय शेजारी, धुळे येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमामध्ये इयत्ता १०वी, १२वी तसेच पदवी व पदव्युत्तर शिक्षणात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. समाजातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक उन्नतीसाठी प्रेरणा निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता सुरु होणार असून, सर्व समाजबांधवांनी कुटुंबासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सत्कारासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपली माहिती व साक्षांकित कागदपत्रांची झेरॉक्स प्रत २२ जुलै २०२६ पर्यंत संत नरहरी महाराज स्मारक समिती कार्यालय, महानगरपालिका, धुळे येथे जमा करावी, असेही संघटनेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.


विद्या प्रसारक मंडळ म्हसावद, द्वारा संचलित

## सातपुडा छात्रालय, म्हसावद

ता.शहादा, जि.नंदुरबार

**वसतिगृहात विद्यार्थी भरणे आहेत**

विद्या प्रसारक मंडळ द्वारा संचलित जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग नंदुरबार अनुदानित सातपुडा छात्रालय म्हसावद, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार या वसतिगृहात सन २०२६-२०२७ या वर्षासाठी खालील वर्गवारी प्रमाणे विद्यार्थी भरणे आहेत.

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनु.जाती | ११% |
| २ | अनु.जमाती | ७९% |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ०८% |
| ४ | आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग | २०% |
| ५ | विशेष मागास प्रवर्ग | ०२% |

तरी इ.५ वी ते १० वीच्या ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी दिनांक- २०/०६/२०२६ पर्यंत अर्ज करावेत.

**अधिक्षक**
**सातपुडा छात्रालय म्हसावद**
**ता.शहादा, जि.नंदुरबार**

**अध्यक्ष**
**सातपुडा छात्रालय म्हसावद**
**ता.शहादा, जि.नंदुरबार**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे वलवाडी ता.जि. धुळे येथील स.नं.१८/१/अ पैकी प्लॉट नं.८० चे एकूण क्षेत्र १८० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील अविभाज्य भागाचे क्षेत्र ९० चौ.मी., बखळ चा प्लॉट.

| यासी | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस- | ०५ मी., | रस्ता ६ मी., |
| पश्चिमेस- | ०५ मी., | ओपन स्पेस, |
| दक्षिणेस- | १८ मी., | प्लॉट नं.७९, |
| उत्तरेस- | १८ मी., | गट नं.८० पैकी भाग |

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही श्री.विनोद नारायण परदेशी रा.धुळे ता.जि. धुळे यांच्या मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचा कडून सदर मिळकत या आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व श्री.विनोद नारायण परदेशी रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट
धुळे, दि.१६/०६/२०२६.

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**

# महापालिकेचे दुर्लक्ष, आर्थिक उधळपट्टी

**जनमानस**

उन्हाळा सुरू झाल्यापासून दिवस मोठा आणि रात्र लहान झाली आहे. तरी देखील सायंकाळी सव्वा सात ते साडे सात वाजता उजेड असतांनाही पथदिवे सुरू केले जातात. तसेच सकाळी पावणे सहा ते सहा वाजता सुर्यप्रकाश पडतो. परंतू महापालिकेचे पथदिवे मात्र सात वाजे पर्यंत चालु राहतात. विजेचे वाढीव बिल महानगरपालिका भरते म्हणजे पर्यायाने नागरिकांचे पैसे खर्च होतात. मनपाने आर्थिक उधळपट्टी कमी करावी.

रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग बऱ्याच ठिकाणी दिसून येतात. पांझरा नदी किनारी, पुलाजवळ, पांझरा पात्रात कचरा मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसतो. पावसाळा सुरू झाल्यानंतर कचरा कोपऱ्यावर एकत्र होवून नदीमधील पाणी तुंबेल आणि कचरा नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणेल. पांझरा पात्रातील कचरा तात्काळ काढावा.

**डॉ.अरूण साळूंखे, नेत्ररोग तज्ञ, ग.नं.५, धुळे.**

### श्रीकृष्ण विद्या.त प्रवेशोत्सव

शहादा, दि.१६(प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील फेस येथील श्रीकृष्ण माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळाप्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. सजविलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली.

## DECLARATION

I, **DAMA urf DAMU GAMA THELARI,** FATHER OF LATE **MR.KHEMA DAMA THELARI,** RESIDING AT. BHONE TAL. NANDURBAR, DIST. NANDURBAR DO HEREBY DECLARE THAT MY SON LATE. **MR.KHEMA DAMA THELARI** PASSED AWAY IN AN ACCIDENT ON 01/12/2024. IN. SOME OFFICIAL DOCUMENTS, HIS NAME IS ALSO RECORDED AS MR. SYAMA DAMU THELARI, I SAY THAT BOTH **MR.KHEMA DAMA THELARI** AND **MR.SYAMA DAMU THELARI,** ARE NAMES OF ONE AND SAME PERSON, WHO IS MY DECEASED SON. THIS STATEMENT IS MADE VIDE MAHARASHTRA GOVT. GAZETTE - RNI NO. MAHBIL/2009/31874 DATED 13-19 MARCH 2025

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SAEEDA BI SHAIKH BIRAM** TO **SAEEDA HANIF MEHTAR**
ADD- H.NO.206, BEHIND MOHAMMADI MASJID, MOHAMMADI NAGAR, DEOPUR, DHULE-424002

## CHANGE NAME

MY OLD NAME (PASSPORT) IS **RAZIYA BANO MOHAMMED IDRIS**
MY NEW NAME (AADHAAR CARD) IS **RAZIYA BANO MOHAMMAD SHABAN**
ADD- PLOT NO.16, NANDI ROAD, MADINA PARK, FIRDOUS NAGER, DHULE-424001 (MS)

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS **MOHAMMAED IDRIS MOHAMMED ABBAS**
MY NEW NAME IS **MOHAMMAD IDREES HAJI MOHAMMAD ABBAS**
ADD- PLOT NO.16, NANDI ROAD, MADINA PARK, FIRDOUS NAGER, DHULE-424001 (MS)

## जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेशाचा जाहीरनामा

**कार्यकारी दंडाधिकारी तथा मे. तहसिलदार शहादा जि. नंदुरबार यांचे न्यायालय, अंतर्गत प्रसिद्धी नोटीस**

क्रमांक/जन्म-मृत्यू/कावि-०९/२०२६
तहसिलदार यांचे कार्यालय शहादा
दि. १६/०६/२०२६

**श्री. रोहिदास रमेश पाटील**
रा. पाडळदा बु. ता. शहादा जि. नंदुरबार ... अर्जदार
।।विरुद्ध।।
**जन्म-मृत्यू निबंधक अधिकारी,**
पाडळदा बु. ता. शहादा जि. नंदुरबार ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्री. रोहिदास रमेश पाटील रा. पाडळदा बु. ता. शहादा जि. नंदुरबार असून त्यांची आजी नामे कै. दगीबाई गोरख पाटील यांचा मृत्यू दि. १५/१२/२०२२ रोजी पाडळदा बु. ता. शहादा जि. नंदुरबार येथे झाला असून त्यांची मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाडळदा बु. ता. शहादा जि. नंदुरबार येथे नसल्याने व सदरील मृत्यू हा एक वर्ष पुढील असल्याने अर्जदाराने दिनांक ११/०८/२०२३ जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) अन्वये मृत्यू दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी शहादा यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील प्रमाणे अर्जात नमूद केलेल्या माहिती विषयी कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दिनांक ०८/०६/२०२६ रोजी किंवा १५ दिवसाच्या आत सुनावणीपूर्वी समक्ष अथवा वकीलामार्फत शहादा येथील कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत: अगर आपल्या वकीलामार्फत हजर न राहिल्यास पुढील योग्य ते हुकूम होईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

(शिक्का)
स्वाक्षरी...
**(संभाजी पाटील)**
कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहशिलदार शहादा

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र. लळींग ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : स. नं. ३१/१/२/३/४/५ पैकी प्लॉट नं. १६० चे एकूण क्षेत्र २२५.०० चौ. मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९०.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे फरीदाबी इब्राहीमखान पठाण रा. पोलीस मुख्यालय, धुळे** यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क,हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे

धुळे, दि. १६/०६/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, शासकीय व निमशासकीय संस्था, वित्तीय संस्था, वगैरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोकर ता. जि. धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. ३/४/अ पैकी प्लॉट नं. ४अ क्षेत्र १०५.९३ चौ. मी. बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे पुर्व : गट नं. ३/४/ब, पश्चिम : ९ मी. रस्ता, दक्षिण : प्लॉट नं. ४ब, उत्तर : प्लॉट नं. ३ब.

येणे प्रमाणे चतु:सिमेतील वरील वर्णनाच्या मिळकतीस यापुढे जाहीर नोटीस मिळकत असे संबोधण्यात आले असे.

सदर मिळकत ही **रविंद्र सोमनाथ अहिरराव** यांच्या मालकीची आहे. वरील मिळकतीच्या खरेदीचा सौदा आमचे अशिल यांनी रविंद्र सोमनाथ अहिरराव यांच्याशी केलेला आहे. सदर वरील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल कायम खरेदीने घेणार असून त्याबाबत सौदा करण्यात येवून बयाण्याची रक्कम ही अदा करण्यात आलेली आहे. तरी आमचे अशिल लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. म्हणून वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचा काही हक्क, सौदापावती, खरेदी, भाडेपट्टा, हितसंबंध, वारस, तारण, गहाण, तबदील, बक्षिसपत्र, अन्य काही व्यवहार झाले असल्यास, कोणाची काही एक हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर ०८ दिवसांच्या आत समक्ष येवून लेखी हरकत घ्यावी. परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह कोणी काही एक हरकत घेतली नाही तर आमचे अशिल वर वर्णन केलेल्या मिळकतीचा कायम खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाची काही एक तक्रार ऐकली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

(सदरहू जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेली कागदपत्रे व माहितीच्या आधारे, आमचे मार्फत दिली असे.)

स्थळ - धुळे, दि. १६/०६/२०२६.

**ॲड.स्वप्निल सुरेश सोंजे** मो.८६९८३३१९९२
३९, सुपडू आप्पा कॉलनी, सुभाष नगर, जुने धुळे ता. जि. धुळे

## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशन)

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकारी व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी ता.जि.धुळे मौजे महिंदळे ता.जि.धुळे येथील गट नं.९०/२/पैकी प्लॉट नं.४० क्षेत्र ९० चौमी आकार रू.१५३.६० असे माप असलेला उत्तरेकडील प्लॉट ची स्के.फुट ९६८.४ ची चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे:-

येणेप्रमाणे वरील मिळकती पैकी हल्ली कब्जेदार व मालक ज्ञानेश्वर गणपत अगस्ती प्लॉट नं.४०, दक्षता पोलीस कॉलनी, सुरत बायपास जवळ ता.जि.धुळे यांचा नावे असलेला व वर नमूद असलेल्या मिळकतीतील संपूर्ण अविभक्त हिस्सा क्षेत्र ९० चौ.मी. प्लॉटमध्ये असलेले जुने व जिर्ण बांधकाम असलेले लोडबेअरींगचे घर आमचे आशिल यांना सदर मिळकत ही कायम विक्रीचा सौद करायचा असून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत, सदर मिळकतीवर आज रोजी कुठलाही प्रकारचा बोजा नाही. तरी, सदर मिळकतीबाबत कोणाचेही काहीएक हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, लिज, लिन, वारस हक्क, खावटी खर्च, मे.कोर्टाचा मनाई हुकूम इतर काही हक्क, हितसंबंध अगर तक्रार असल्यास आवश्यक त्या मुळ कागदपत्रांसोबत सदर आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत नोटीस प्रसिध्द पासून खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे, मुदतीत न आलेल्या हरकती तसेच परस्पर वर्तमान पत्रातून घेतलेल्या हरकती आमचे आशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक:- १६/०६/२०२६.

**ॲड.अमित अशोक वाघ**
२२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, देवपूर, धुळे.
**मो.नं.९८२३१३६००७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता. धुळे पैकी धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे देवपूर येथील स.नं.७३/१ पैकी प्लॉट नं.८६ चे क्षेत्र २०७.५० चौ.मी. यासी विस्तारी हद्दीतील सि.स.नं.३७०५ चे क्षेत्र २१०.१० बखळ प्लॉट यासी मापे व चतु:सिमा-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस- | १५ मी., | प्लॉट नं.८५, |
| पश्चिमेस- | १५ मी., | वापर व रस्ता, |
| दक्षिणेस- | १४ मी., | वापर व रस्ता, |
| उत्तरेस- | १५.५ मी., | प्लॉट नं.९०. |

सदरचा बखळ प्लॉट श्री.चंद्रकांत राजाराम बागुल रा.०१, सिंघल नगर, दत्तमंदिररोड, देवपूर, धुळे यांचे मालकीची व ताबेउपभोगातील असून सदर मिळकत आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. त्यापोटी बयाणा रक्कम देखील अदा केली आहे. सदर मिळकती संबंधी कोणाचाही, खरेदी, विक्री, टाच जप्ती, गहाण, भाडे करारनामा, कोर्ट कचेरी, वाटणी हक्क, वारसा हक्क, वहीवाट हक्क, पतपेढी बोजा, बँक बोजा, जनरल मुखत्यार, अगर इतर हस्तांतरीत हक्क असल्यास आमचे अशिलांना कळणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरची जाहीर नोटीस दिली असे.

वरील जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसाचे आत खालील पत्त्यावर कोणाचेही हरकती अथवा तक्रार अथवा हक्क अधिकार असल्यास लेखी स्वरूपात कळविण्यात यावे तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलाची खात्री करून द्यावी वरील मुदतीत कोणाचेही लेखी हरकती अथवा तक्रारी न आल्यास खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक:- १६/०६/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला अन्सार मस्जिद समोर ८० फुटीरोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधितीयांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे महिंदळे ता. जि. धुळे हद्दीतील गट क्रमांक व उपविभाग नं. ९३/१अ/२/३/४/५/६/९१/१/क पैकी प्लॉट नं. १९४ यांसी क्षेत्र १२० चौ. मी. १२९१.२ चौ. फुट सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालील प्रमाणे.

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस : | प्लॉट नं. १९३ |
| पश्चिमेस: | प्लॉट नं. १९५ |
| दक्षिणेस : | प्लॉट नं. २१८ |
| उत्तरेस : | ९ मीटर रोड |

येणे प्रमाणे मिळकतीचे मालक सुनिल मन्साराम शिंदे रा. शांतुष नगर सुरत बायपास रोड, चंद्रीप हॉटेलच्या समोर असलेले यांनी आमचे पक्षकार सिद्धांत हरचंद वेंदे रा. नरव्हाळ, ता. जि. धुळे यांच्या सोबत कायम विक्रीचा सौदा केला असून बयाणा पोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकत बाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, तसेच इतर काही हक्क, हितसंबंध अगर तक्रार असल्यास, मुळ कागदपत्रासोबत आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे. नियोजित कालावधीमध्ये कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकत आमच्या पक्षकारावर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेतल्यास ती देखील आमच्या पक्षकारावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व दस्त ऐवजावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
ठिकाण: धुळे दि. १६/०६/२०२६

**ॲड.विलास गोपिचंद भामरे**
(नोटरी भारत सरकार)
निवास/कार्यालय-१९, संपदानगर, विद्यानगरी, देवपूर, धुळे
मो. ९९७०२७२७१४/७७७५९४२७१४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधितांना प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** तु.जि.धुळे पो.तु.ता. शिंदखेडा पैकी दोंडाईचा न.पा. हद्दीतील सर्वे नं.१३६/१ पैकी प्लॉट नं.३० चे क्षेत्र. ८० चौ. ही बखळ मिळकत ची चतु:सिमा:-

पुर्वेस- सर्वे नं.१३०,
पश्चिमेस- कॉलनी रोड,
दक्षिणेस- प्लॉट नं.२९,
उत्तरेस- प्लॉट नं.३१.

वर नमूद चतु:सिमांकित मिळकत ही आशाबाई संजयसिंग राजपूत यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील आहे. सदर मिळकतींचे पूर्वीचे मालक राजेश शांतीलाल जैन वगैरे ७ व निर्मला आत्माराम पगारे यांचेत झालेले मुळ/अस्सल खरेदीखत दस्त क्रं.२७०५/२००६ दि.०५/१०/२००६ रोजीचे गहाळ झाले, हरविले आहे.

तरी सदर आशाबाई संजयसिंग राजपूत हे जे एम फायनान्सीयन होम लोन्स लिं. यांचेकडून सदर मिळकतीवर कर्ज घेत असून सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कुठल्याही प्रकारची हरकत किंवा सदर मिळकत ही खाजगी, सरकारी, निमसरकारी वित्तीय संस्था, बँक, सोसायटी इ. कडे गहाण असल्यास सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रांसह प्रत्यक्ष लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्बोज व निर्वेध्य समजण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती, दस्तऐवज, अधिकारावरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दि.१६/०६/२०२६.

**ॲड.सागर पी. सोनवणे**
४, शिव कॉलनी, मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे.
**मो.नं.९४२०३७३५३०**

# शिरपूर वरवाडे नगरपरिषद

ता.शिरपूर, जि.पिन धुळे., ४२५४०५
E-mail Id:-shirpurnagarparishad@gmail.com Phone No ) ०२५६३(२५५०४२/२५५७४२
जा क्रं.१०४९/पापुविभाग/२०२६-२०२७ दिनांक १६/०६/२०२६

## जाहीर निविदा सूचना

म.मुख्याधिकारी, शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे द्वि-लिफाफा पद्धतीने कामनिहाय पात्र कंत्राटदार/मक्तेदार/पुरवठादार/विक्रेते आदी कडून खालील कामाकरिता निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा फॉर्म सदर निविदा प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत (दि.२५/०६/२०२६ पर्यंत) कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत प्रसिध्दी दिनांकापासून ते दि.२९/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न.पं. राखून ठेवला आहे.

| अ. क्रं. | कामाचा तपशील | कोऱ्या निविदा फॉर्म किंमत (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभागासाठी टीसीएल पावडर, ISI मार्क, फर्स्ट ग्रेड, ट्रिपल पॉलिथीन २५ कि. ग्रॅ. पॅकिंगची, ३४% क्लोरीनयुक्त पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |
| २ | पा.पु. व एस. टी. पी. विभागासाठी क्लोरीन गॅस (९०० कि. ग्रॅ. टनर मध्ये) जागेवर पुरवठा करणे व अनुषंगिक कामे करणे. | १०००/- | १००००/- |
| ३ | पाणीपुरवठा विभागासाठी तुरटी १६ (स्लॅब) ग्रेड-४ पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |

सही
**(प्रशांत सरोदे)**
**मुख्याधिकारी**

सही
**(चिंतनभाई पटेल)**
**अध्यक्ष**

## पान १ वरुन

### नीटच्या प्रवेशपत्राचा घोळ सुरूच

परीक्षेच्या वेळी परीक्षार्थींना मिळालेले परीक्षा केंद्र बदलले आहे. काहींना शहराबाहेरील कॉलेजमधील केंद्रे मिळाली आहेत.

**भारतात टेलिग्रामवर तात्पुरती बंदी**

केंद्र सरकारने देशभरात टेलिग्राम या लोकप्रिय मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर २२ जून २०२६ पर्यंत तात्पुरती बंदी लागू केली आहे. हा निर्णय २१ जून रोजी होणाऱ्या नीट- २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला असून, परीक्षा प्रक्रियेत होणारे गैरप्रकार, बनावट प्रश्नपत्रिका, अफवा आणि संभाव्य पेपर लीक रोखणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि केंद्र सरकारच्या माहितीनुसार, काही फसवणूक करणारे गट टेलिग्रामचा वापर करून विद्यार्थ्यांना कथित प्रश्नपत्रिका विकणे, पेपर लीकच्या अफवा पसरवणे आणि आर्थिक फसवणूक करणे यासाठी करत होते. यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षेच्या विश्वासार्हतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. सरकारने केवळ टेलिग्रामवरील प्रवेशच मर्यादित केलेला नाही, तर प्लॅटफॉर्मला मेसेज एडिट (संपादन) सुविधा देखील काही काळासाठी बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. अधिकृत माहितीनुसार, भारतात ही सुविधा २२ जूनपर्यंत मर्यादित ठेवण्यास सांगण्यात आले आहे. तपास यंत्रणांच्या मते, आधी पोस्ट केलेल्या संदेशांमध्ये नंतर बदल करून खोटी माहिती पसरवली जात असल्याच्या तक्रारी होत्या.सरकारचे म्हणणे आहे की सार्वजनिक सुव्यवस्था आणि परीक्षेची पारदर्शकता राखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या निर्णयाचा परिणाम टेलिग्रामवरील अनेक शैक्षणिक चॅनेल्स आणि ग्रुप्सवर होणार आहे. परीक्षा संबंधित अफवा आणि बनावट पेपरच्या व्यवहारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुनर्परीक्षेच्या काळात डिजिटल माध्यमांवरील देखरेख अधिक कडक राहणार असल्याचेही संकेत मिळत आहेत.

### बारा तासांत दोनदा भूकंप वसमतकर चिंतातूर

सुमारास पुन्हा एकदा तीन रिश्टर स्केल तीव्रतेचा दुसरा मोठा धक्का बसला. एकापाठोपाठ एक बसलेल्या या धक्क्यांमुळे नागरिक जीव मुठीत धरून घराबाहेर पळाले.

**प्रशासनाकडून सतर्कतेचे आवाहन**

सततच्या भूकंपाच्या धक्क्यांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सांगितले असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. सोमवारी रात्री बसलेल्या धक्क्याची अधिकृत नोंद झाली नसली, तरी मंगळवारी पहाटेच्या धक्क्याची तीव्रता तीन रिश्टर स्केल इतकी मोजली गेली आहे. घरांना तडे गेले असल्यास किंवा जुनी बांधकामे असल्यास नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी. भूकंप सदृश परिस्थिती जाणवल्यास उघड्या मैदानात किंवा सुरक्षित जागी आश्रय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुडेंसारख्या अधिकाऱ्याची बदली नको

झेड दर्जाची सुरक्षा प्रदान करावी. अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. कल्याण येथील बौद्धभूमीच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा व बौद्ध बांधवांच्या भावना दुखावणाऱ्या घटनांची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी समितीने शासनाकडे केली आहे. यावेळी संविधान संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, ज्येष्ठ पत्रकार गो.पी. लांडगे, कॉ. एल.आर. राव, दीपक जाधव, जी.डी. जाधव, बी.टी. अहिरे, श्रीकृष्ण बेडसे, हर्षबोध मोरे, काशिनाथ शिंदे, छोटू मोरे, मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर, विजय वाघ, कॉ. पोपटराव चौधरी, कॉ. वसंत पाटील, दीपक सोनवणे यांच्यासह समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भगवान बिरसा मुंडांचा पुतळा उभारणार

माध्यमातून संपूर्ण परिसराचे सौंदर्यकरण होणार असून, आकर्षक सुशोभीकरण, हिरवाईयुक्त बगीचा आणि नागरिकांसाठी पिकनिक पॉइंट विकसित केला जाणार आहे. पुतळा उभारणीसाठी आमदार निधीतून आर्थिक तरतूद करण्यात आली असून, आवश्यकतेनुसार उर्वरित निधी नगरपालिकेकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

भूमिपूजन कार्यक्रमास नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. राम रघुवंशी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी, नगरसेवक किरण रघुवंशी, बांधकाम सभापती देवेंद्र जैन, पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील, आरोग्य सभापती प्रीतम धंडोरे, देवमोगरा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बटेसिंह वसावे, डॉ. राजेश वळवी, नगरसेवक यशवर्धन रघुवंशी, महिला व बालकल्याण सभापती शितल वसावे, शिक्षण सभापती भावना गुरव, नगरसेविका सोनिया राजपूत, नगरसेवक राऊ मोरे, भरत चौधरी, भूषण नेरे, जितेंद्र मराठे, मालती वळवी, प्रशांत चौधरी यांच्यासह आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाचे लोकनायक आणि महान स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी आदिवासी बांधवांवरील अन्यायाविरोधात संघर्ष करून समाजात जागृती घडवून आणली. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळावी, यासाठी हा स्मारक प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

सौ.रत्ना रघुवंशी, नगराध्यक्ष

### रस्ता व गटारीची समस्या वार्ड ३ ची जनता त्रस्त

आहेत. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मनपा प्रशासनाने प्रभाग समस्यामुक्त करावा. अशी मागणी किरण फुलपगारे, राहुल फुलपगारे, मच्छिंद्र फुलपगारे, शत्रुघ्न तायडे, भटू ढोले, पिंटू फुलपगारे यांनी केली.

### अवैध दारू व ताडी अड्ड्यांवर राज्य उत्पादन

या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील गावठी हातभट्टी निर्मिती, विक्री केंद्रे तसेच ताडी विक्री केंद्रांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आले. या कारवाईत आतापर्यंत एकूण ९१ गुन्हे नोंदवण्यात आले असून ७८ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या धडक कारवाई दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी आरोपींच्या ताब्यातून ३ हजार ६१८ लीटर गावठी हातभट्टी दारू, ११ हजार ३८५ लीटर दारू बनवण्याचे रसायन, ५९५ लीटर ताडी आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली एकूण ५ दुचाकी वाहने जप्त केली आहेत. जप्त करण्यात आलेल्या या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ११ लाख ३७ हजार ११५ रुपये एवढी असून हा संपूर्ण मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.

ही धडक कारवाई राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाचे निरीक्षक व्ही. ए. चौरे, नंदुरबारचे निरीक्षक राजेश सपकाळ, दुय्यम निरीक्षक शरद कानडे (विभाग अ), अमित गायकवाड (विभाग ब), प्रणव मोरे (विभाग क) तसेच सीमा तपासणी नाका बेडकीपाडा येथील दुय्यम निरीक्षक कुणाल पाटील, खेडदिगर नाक्याचे हेमंत घरटे, विकास हरिश्चंद्रे आणि त्यांच्या जवान व कर्मचाऱ्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. जिल्ह्यातील अवैध मद्य व्यवसाय पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी अशीच धडक कारवाई पुढेही अविरत चालू राहणार असल्याची माहिती भरारी पथकाचे निरीक्षक यांनी दिली आहे. नंदुरबार जिल्हा हद्दीत कुठेही अवैध मद्यनिर्मिती, विक्री अथवा वाहतूक होत असल्यास नागरिकांनी तात्काळ १८००८३३३३३३ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती किंवा तक्रार नोंदवावी, असेही आवाहन राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकातर्फे करण्यात आले आहे.

### ट्रकखाली चिरडून महिला जागीच ठार

धडकेमुळे रेखाबाई भारुडे मोटार सायकल वरून खाली पडल्या. त्याचवेळी मागून येणाऱ्या ट्रक खाली त्या आल्या, ट्रकचे मागील चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्या जागीच ठार झाल्या, भावसिंग मालुसरे यांनाही किरकोळ दुखापत झाली. पिंपळनेर पोलिस ठाण्यात ट्रक चालकावर अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक संसारे तपास करीत आहेत.

## पान १ वरुन

### अनु.जातीचे दाखले द्या कोळी महासंघाची मागणी

देण्यात आले. कोळी समाजाच्या प्रश्नांसंदर्भात तत्कालिन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अनुषंगाने अंमलबजावणी होणे अपेक्षित होते. परंतु राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीच्या आचार संहितेमुळे राज्य शासनाकडून दिरंगाई झाली. यामुळे कोळी समाजातून नाराजी व्यक्त केली जात आहे. अनुसुचित जमातीचे दाखले मिळण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना स्मरण व्हावे यासाठी हे निवेदन देण्यात आले. अनुसुचित जमातीतील बांधवांना जातीचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र मिळावे. या मागणीचे निवेदन कोळी महासंघाचे मनोज निकम, बबलू कोळी, कविता कोळी, मंगला सोनवणे, किरण कुलेवार, भारत ईशी, सुरेश कुवर, कैलास ईशी, छोटू कोळी, जयेंद्र सुर्यवंशी, जगन सोनवणे, संदिप जगदाळे यांनी दिले.

### प्रांत.अधिकारी व शेतकऱ्यांची बैठक

मोबदलाहा प्रति चौरस मीटर ने देण्यात यावा, ज्याप्रमाणे पुरंदर विमानतळ, समृद्धी महामार्ग, मोबदला दिला त्याप्रमाणे वन टाईम सेटलमेंटने देण्यात यावा. पालघर जिहाल्यातील डहाणू-वाधवन बंदर च्या रेल्वे कनेक्टीव्हिटीसाठी आधी मोबदला निश्चित केला त्याप्रमाणे आधी मोबदला काय व किती देणार हे लिखित स्वरूपात जाहीर करावे. ज्या जमीनीचे तुकडे होतील त्या शेतजमिनी सुद्धा संपदित करण्यात यावा खासगी बाजारभावानुसार शासकीय बाजारभावानुसार नव्हे. शासनाकडून दिला जाणार मोबदला व प्रत्यक्ष खासजी बाजारभाव यात मोठी तफावत असल्याने शेतकऱ्यांचा विरोध प्रकल्पला विरोध नाही विकासाला शेतकऱ्यांचा विरोध नाही. यावेळी प्रांतधिकारी रोहन कुवर, मंडळ अधिकारी बांगर,महसूल सहाय्यक सुधीर भामरे, मोहिते नाना,तलाठी (आर्वी, लळिंग, पुरमेपाडा), रेल्वेचे भूषण रघुवंशी व आर्वी, लळींग, पुरमेपाडा, राणमाळ, पिंपरी येथील मनमाड-इंदोर रेल्वेमार्ग बाधित शेतकरी संघर्ष समतीचे जयेश चौधरी, जिभाऊ शेणगे, भारत बागले, अनिल संचेती, प्रभाकर जाधव, गोपी ठाकरे, सतीश पाटकर, संजय चौधरी, शिवाजी पगारे, पांडुरंग ततार, युनूस खाटीक व अन्य शेतकरी उपस्थित होते.

### पवनराजे हत्याकांड निकाल वीस जूनला

घटनेत मृत झालेले पवनराजेंचे चालक समद काझी यांचे कुटुंबही न्यायाच्या आशेने मुंबईत दाखल झाले होते. न्यायाधीशांनी निकालासाठी पुढील तारीख दिल्यामुळे दोन्ही कुटुंबांची प्रतीक्षा आणखी ताणली गेली आहे. यापूर्वी चौदा मेस झालेल्या सुनावणीत मुख्य आरोपी डॉ. पद्मसिंह पाटील आणि मोहन शुक्ला यांनी वैद्यकीय कारणास्तव मुदत मागितली होती. राजकीय वैमनस्यातून तीन जून २००६ रोजी नवी मुंबईतील कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

## प्रलंबित मानधनासह मागण्या मंजूर करा रास्तभाव दुकानदारांनी दिले निवेदन

**धुळे, दि.१६- जिल्ह्यातील रास्तभाव दुकानदारांचे प्रलंबित मानधन मिळण्यासह दि.१५ जुलै पर्यंत धान्य वाटपास मुदतवाढ मिळावी तसेच इतर मागण्या मंजुर कराव्यात. अशा आशयाचे निवेदन धुळे जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक संघटना धुळे, च्या पदाधिकाऱ्यांनी खा.शोभा बच्छाव, पालकमंत्री ना. जयकुमार रावल, जिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी यांना दिले.**

रास्तभाव दुकानदारांना धान्य वाटप बाबतचे कमिशन मिळण्यास पाच ते सहा महिने उशीर होत आहे. आता डिसेंबर २०२५ पर्यंत कमिशन मिळाले असून जानेवारी २०२६ पासूनचे कमिशन अदा करण्यात आलेले नाही.त्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांपुढे अनेक समस्या निर्माण होतात. कुटुंबाच्या आर्थिक अडचणी दुर होण्यासाठी दुकानदारांना कामाचा मोबदला वेळेत मिळणे आवश्यक आहे. कमिशनची रक्कम तात्काळ मंजूर करण्याचे निर्देश द्यावे. धान्य वाटपाचे प्रति क्विंटल कमिशन १७० आहे. परंतू सदर कमिशन पुरेसे नाही. सदर कमिशन दोनशे पन्नास रूपये प्रति क्विंटल प्रमाणे मंजुर करावे. धान्याचे पोत्याचे वजन पन्नास किलो पाचशे ऐंशी ग्रॅम नुसार मिळावे. भरडधान्य खरेदी झाल्यावर जिल्ह्यातील चारही तालुक्यांना समान प्रमाणात वाटप करण्यात यावे. जुन २०२६ चे धान्य रास्तभाव दुकानांवर उशीरा पोहचल्याने पंधरा जुन २०२६ पर्यंत मुदतवाढ होती, धान्य वाटपास दि.१५ जुलै २०२६ पर्यंत मुतदवाढ मिळावी. यांसारख्या विविध मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदन देतांना मधुकर पाटील, विलास चौधरी, प्रशांत पाटील, किरण पाटील, भाईदास पाटील, लक्ष्मण वाघ, हिरामण पाटील, प्रमोद चौधरी, लोकेश पटेल उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शकुंतला कुलकर्णी



शिरपूर, दि. १५ - शहरातील सुभाष कॉलनी येथील रहिवासी शकुंतला शशिकांत कुलकर्णी (वय ७२) यांचे हैदराबाद येथे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सुभाष कॉलनी येथील राहत्या घरापासून दि. १६ जून रोजी दुपारी काढण्यात आली होती. एकविरा देवी जवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, तिन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिरपूर पंचायत समिती येथील कर्मचारी स्व. शशिकांत कुलकर्णी यांच्या त्या पत्नी, सुभाष कुलकर्णी यांच्या वहिनी तर प्रसाद कुलकर्णी यांच्या मातोश्री होत.



## एच. आर. पटेल कन्या विद्यालयात विद्यार्थिनींना मोफत एस.टी. पास

**शिरपूर, दि.१६- तालुक्यातील वरूळ येथील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ शिरपूर आगार तर्फे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर व मानव विकास मिशन अंतर्गत विद्यार्थिनींना मोफत एस. टी. पासचे वितरण करण्यात आले.**

विद्यालयात जुनी व नवी अंतुर्ली, तऱ्हाडकसबे, तऱ्हाडी, अभाणपूर, भामपूर या गावाहून शिक्षणासाठी वरुळ येथील विद्यालयात येणाऱ्या एकूण २२२ विद्यार्थिनींना शिरपूर आगार नियंत्रक उदय न्हावळदे, प्राचार्य डॉ. सी.जी.पाटील यांच्या हस्ते मोफत पास वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी प्रवासाचा खर्च कमी होऊन त्यांना नियमितपणे शाळेत येणे अधिक सोयीचे होणार आहे. कार्यक्रमासाठी विद्यालयातील परिवहन विभाग प्रमुख बी. एन. पाटील व शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


**पाहिजेत**
CA (Chartered Accountant) Office कामासाठी FEMALE STAFF पाहिजे
• Education and Skills:
B. Com, CA PURSUING
Tally Prime, GST, Income Tax Knowledge,
English Knowledge
(Freshers Can Also Apply)
• Job Description:
Accounting, Auditing, GST, Income Tax, TDS, Professional Tax Return Filling and other office working
पगार – ₹15,000 ते ₹25,000 /-
Dharam M. Shah & Associates
Malegaon Road, Near Ganapati Palace, Dhule - 424001
Mobile : 8329978795 Email: cadharamshah2@gmail.com

**पाहिजेत**
एके मीडिया धुळे या अग्रगण्य जाहिरात एजन्सीला खालील पदांसाठी उत्साही व मेहनती उमेदवारांची आवश्यकता आहे.
» वसुली प्रतिनिधी - 1
पदवीधर व मोटार सायकल आवश्यक
» डीटीपी ऑपरेटर - 2
कोरल-फोटोशॉप, मराठी टायपिंग आवश्यक
अर्जासह भेटा: स. ११ ते संध्या. ७ पर्यंत
एके मीडिया
पहिला मजला, सत्यम आर्केड, पतंजली स्टोअर्स समोर, नगरपट्टी, धुळे.
94222 86280

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी मुले/माणसे पाहिजेत.
- समक्ष भेटा -
अन्नपूर्णा जलगाववाला मावा कुल्फी
आग्रा रोड, गांधी चौक, धुळे
9595552331

**नविन शोरुम भाड्याने देणे आहे**
टु व्हिलर शोरुम, म्युच्युल फंड, शासकीय-निमशासकीय इ.ऑफिस ट्रान्सपोर्ट कं.+ गोडाऊन फायनौन्स कं. तयार शोरुम. फर्निचर + एसी सर्व सोयीयुक्त १८x४० ऑफिस १५x३६ गोडाऊन २००० स्केअर वॉल कम्पाऊंड ५३०० स्केअर फुट जागा भाड्याने देणे आहे.
भेटण्याची वेळ संध्या – ५ ते ८ वाजता
एस.एम. प्रापर्टीज - 9309881272

**पाहिजेत**
१) ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. फ्रेशर पण चालेल.
२)फोटोशॉप कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.फ्रेशर/अनुभवी असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
मुंबई आग्रा हायवेजवळ, रामनगर धुळे
7666176855

**हरवले आहे**
ऋषिकेश दादाजी पाटील रा.चांदे जि.धुळे यांचे चांदे येथून शिरुड येथे जातांना बी-फार्मसीचे सेमिस्टर १ व २ चे मार्कशीट हरवले आहे. जर हे आढळल्यास
9623172791
या क्रमांकावर संपर्क करावे.

**लहान प्लॉट विकणे**
पन्नास फुटी डीपी रोडला लागून सुमारे चौदाशे फुटाचा उत्तरमुखी प्लॉट विकणे आहे.
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**स्टेशन रोड प्लॉट विकणे**
स्टेशन रोडवर दोन रोड कॉर्नर प्लॉट हॉस्पिटल, डॉक्टर्स, शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी उपयुक्त विकणे आहे.
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे आहे**
दिलीप दुध डेअरी समोर आर्वी मौजे ता.धुळे गट नं.२६५/३-६ हायवे टच प्लॉट विकणे आहे. प्लॉट नं.१,२,३,४, ५,६,७,८, सर्व प्लॉट ३७६२ स्केअर फुट आहे. ५०x७५ साईज आहे. सर्व प्लॉट हायवे सर्विस रोडटच आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**जागा विकणे आहे**
नविन सुरत, नागपूर बायपास वर (वडजाई) गट नं.१६९ बिनशेती झालेली २५० फुट हायवे सर्विस रोडटच आणि एक साई वडजाई रोड टच जमीन विकणे आहे. जागा २३ R आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**प्लॉट विकणे आहे**
हॉटेल ५५५५ समोर मोहाडी गट नं. ४९ प्लॉट नं.१०७ आणि १०९ १९०० + १९०० स्केअर फुटचे प्लॉट विकणे आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**जागा विकणे आहे**
मोघण ता.धुळे आर्वी - शिरुड रोडटच गट नं.५३/१ अ ६० आर जमीन बिनशेती झालेली २०० फुटचावर फरंन्ट असलेली जमीन विकणे आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**शेतजमीन विकणे**
साक्री रोडटच तीन एकर शेत जमीन विकणे आहे.
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**स्नेहनगर प्लॉट विकणे**
धुळ्याच्या पॉश वसाहतीत स्नेहनगर मध्ये सुमारे ३००० फुटाचा प्लॉट विकणे आहे.
डी.आर.प्रॉपर्टीज
9422289693

GK ARCADE Shops & Luxurious Flats
जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी
सेल्स प्रतिनिधी पाहिजेत
नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.
प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित
आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी!
रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...
पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वतःची दुचाकी असणे आवश्यक.
आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677 94227 92677

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम/पार्टटाईम त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**पाहिजे**
मेन्स वेअर शोरुमसाठी सेल्समन पाहिजे.
- संपर्क -
8888294987


**तार कंपाऊंड**
तार कंपाऊंड तयार करुन मिळेल.
शांती सिमेंट प्रॉडक्टस, एमआयडीसी, धुळे
- संपर्क -
9422289550

**पाहिजेत**
ऑनलाईन कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर मुलगा लागणार आहे.
योगेश झेरॉक्स ॲण्ड स्टेशनर्स
जुने जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
9527030722

**प्लॉट विकणे आहे**
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422289235

**पाहिजे**
पारोळा रोड किंवा प्रकाश टॉकीज परिसर येथे दुकान भाड्याने पाहिजे.
7744009966

**जागा कराराने देणे**
सर्व सोयीयुक्त ६०० स्के.फुट जागा बँक, ऑफिसेससाठी कराराने देणे आहे.
पत्ता - ग.क्र.५, शाळा क्र.९ च्या बाजुला, धुळे
9823561526

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej

2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०